http://www.sgbauonline.com/



# M.A. (Part–I) (Marathi) Semester—I Examination
## MARATHI
## (Vishesh Wangmay Prakar (Lalit Gadya)
## Paper–4(C)

वेळ : 3 तास] [गुण : 80

सूचना :—(1) सर्व प्रश्नांना समान गुण आहेत.

(2) वस्तुनिष्ठ प्रश्नांची उत्तर एकापेक्षा अधिक वेळा लिहिल्यास मूल्यांकनासाठी पहिले उत्तर ग्राह्य धरण्यात येईल.

1. ललित गद्य म्हणजे काय ? ते सांगून ललित गद्यातून 'मी' चा शोध कसा घेतल्या जातो ते सोदाहरण स्पष्ट करा.

**किंवा**

ललित गद्याच्या विविध प्रकारांचा परामर्श घ्या.

2. 'अलकेचा प्रवासी' मधून येणाऱ्या सौंदर्यपूर्ण प्रत्ययाचे विवेचन करा.

**किंवा**

बी. रघुनाथ यांच्या ललित गद्यलेखनाचे विशेष 'अलकेचा प्रवासी' च्या आधारे स्पष्ट करा.

3. "महाभारताच्या व्यक्तिरेखांमधून पार्थिवतेचा विलक्षण चैतन्यमय स्रोत जाणवतो" असे दुर्गा भागवतांना का वाटते ? सविस्तर स्पष्ट करा.

**किंवा**

धार्मिक-पारमार्थिक जीवनाच्या अनुषगाने व्यक्त होणाऱ्या श्रीनिवास कुलकर्णी यांच्या चिंतनशीलतेचा 'सोन्याचा पिंपळ'च्या आधारे आढावा घ्या.

4. "इर्जिक' मधून लोकसंस्कृती, कृषिजीवन आणि ग्रामव्यवस्था यांचा सशक्त आणि ललितरम्य आविष्कार झाला आहे," या विधानाचा परामर्श घ्या.

**किंवा**

'इर्जिक' चे वाङ्मयीन विशेष स्पष्ट करा.

5. योग्य पर्याय निवडून खालील वस्तुनिष्ठ प्रश्नांची उत्तरे लिहा. (उदा. प्रश्न क्र. 1 - क) संत तुकाराम :—

(1) उत्तम लघुनिबंधात अनंत काणेकर यांच्या मते काय असायला हवे ?

(अ) विशिष्ट व्यक्तित्वाचा स्वच्छंद आविष्कार (ब) विद्वत्ता

(क) तार्किक विश्लेषण (ड) मनोकल्पनांची भरारी

(2) "जीवनांच ज्वलन शांत करण्याचं सामर्थ्य असेल तर ते फक्त सुंदर पुस्तकातच !" हे विधान कोणाचे ?

(अ) अनंत काणेकर (ब) बी. रघुनाथ

(क) दुर्गा भागवत (ड) श्रीनिवास कुलकर्णी

(3) दुर्योधनाने कर्णाला कोणत्या देशाचे राजपद दिले होते ?

(अ) कौशल (ब) काशी

(क) अंगदेश (ड) इंद्रप्रस्थ



http://www.sgbauonline.com/

http://www.sgbauonline.com/

(4) पाण्यात पीठ घालून मुलाला दूध म्हणून पाजण्याचा प्रसंग कोणत्या व्यक्तिरेखेशी संबंधित आहे ?

(अ) द्रुपद (ब) कृपाचार्य

(क) द्रोणाचार्य (ड) भीष्म

(5) 'इर्जिक' या ललित लेखसंग्रहाला कोणाची प्रस्तावना लाभली आहे ?

(अ) एस.एस. भोसले (ब) अनंत काणेकर

(क) आनंद यादव (ड) दत्ता भोसले

(6) फेमिनिस्ट लोकांचे बायबल म्हणून कोणते पुस्तक प्रसिद्ध आहे ?

(अ) दास कॅपिटल (ब) अपूर्ण क्रांती

(क) जाहीरनामा (ड) द सेकंड सेक्स

(7) "धनानि भूमौ पशवश्च गोष्ठे
भार्या गृहद्वारि जनश्मशाने"
हा श्लोक कोणत्या पुस्तकात समाविष्ट आहे ?

(अ) सोन्याचा पिंपळ (ब) व्यासपर्व

(क) इर्जिक (ड) अलकेचा प्रवासी

(8) "कुबेर तुझा भांडारी, ________ " रिकाम्या जागी योग्य पर्याय निवडा.

(अ) मात्र नशिबी फकिरी (ब) आम्हां फिरविसी दारोदारी

(क) कवडी न दिसे पदरी (ड) पदरी रानोमाळ भटकंती



http://www.sgbauonline.com/